सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/रापनों-२०२४/प्र.क्र.२४/का.११
१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र२२८७६२२६. Email- sec.mh@gov.in
दि. ०७ नोव्हेंबर २०२५

प्रति,

विभागीय आयुक्त (सर्व)

जिल्हाधिकारी (सर्व)

महानगरपालिका आयुक्त (सर्व)

**विषय :** नामनिर्देशनपत्रासोबतच्या 'नमुना २-अ' आणि 'जोडपत्र १' स्वीकारण्यासंदर्भात...

**संदर्भ:** १) महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५.

महोदय,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षाची आयोगाच्या कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठीचा 'नमुना २-अ' आणि महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठीचे 'जोडपत्र-१' ही लेखी सूचना पत्रे स्वीकारण्याबाबत अधिक स्पष्टता करण्यात यावी, अशी सूचना सदर बैठकीत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी केली होती.

उपरोक्त संदर्भांकित विषयाबाबतचा - महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ हा आदेश दि. ५ मे २०२५ रोजी राज्य निवडणूक आयोगाने राजपत्रात प्रसिद्ध केला आहे. सदर आदेशातील भाग चारमध्ये निवडणूक चिन्ह आरक्षण व वाटपाबाबत तपशीलवार प्रक्रिया नमूद केली आहे.

'नमुना २-अ' आणि 'जोडपत्र-१' ही लेखी सूचनापत्रे राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करावयाच्या व्यक्तीची माहिती देण्याकरिता आहेत. सदर लेखी सूचनापत्रे संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त; तसेच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे देणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकाच वेळी मोठ्याप्रमाणात निवडणुका होत असताना सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे ही मूळ लेखी सूचनापत्रे सादर करणे जिकरीचे आहे, असे मत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी बैठकीत व्यक्त केले होते. त्यापार्श्वभूमीवर आणि उपरोक्त संदर्भांकित आदेशाच्या भाग सहामधील परिच्छेद २७(१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार खालीलप्रमाणे स्पष्टिकरण करण्यात येत आहे.

१. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षाने मूळ सहीचे 'नमुना २-अ' (जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी 'नमुना २-अ' चे स्वतंत्र नमुने आहेत) हे लेखी सूचनापत्र; तर नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी 'जोडपत्र-१' सर्व प्रत्येक संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना विहित मुदतीत देणे आवश्यक आहे आणि ते त्यांना सादर करुन त्यांची पोहोच घ्यावी.

२. सदर पोहोच लेखी सूचनापत्रांवरच घेतलेली असावी व त्याची छायांकित प्रत राजकीय पक्षाने आपल्या उमेदवाराला द्यावी. उमेदवाराने आपल्याशी संबंधित मूळ सहिच्या 'नमुना २-ब' किंवा 'जोडपत्र-२' सोबत वरील मुद्दा क्र. १ मधील संदर्भात संबंधित पोहोचची छायांकित प्रतदेखील प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत देणे आवश्यक आहे.

३. महानगरपालिका निवडणुकांसाठी राजकीय पक्षाने मूळ सहीचे 'जोडपत्र-१' हे लेखी सूचनापत्रे प्रत्येक संबंधित महानगरपालिका आयुक्तांना विहित मुदतीत देणे आवश्यक आहे आणि ते दिल्याची पोहोच घ्यावी.

४. सदर पोहोच लेखी सूचनापत्रांवरच घेतलेली असावी व त्याची छायांकित प्रत राजकीय पक्षाने आपल्या उमेदवाराला द्यावी. उमेदवाराने मूळ सहीचे 'जोडपत्र-२' सोबत वरील मुद्दा क्र. ३ मधील संदर्भात संबंधित पोहोचची छायांकित प्रतदेखील प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत देणे आवश्यक आहे.

५. 'नमुना २-अ' 'जोडपत्र-१' प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांनी उपरोक्त संदर्भांकित आदेशातील परिच्छेद २०(३) नुसार सदर लेखी सूचनापत्रांच्या प्रती प्रमाणित करून त्या प्रत्येक निर्वाचन अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तातडीने पाठवाव्यात.

६. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून आलेल्या प्रमाणित 'नमुना २-अ' किंवा 'जोडपत्र-१' ची प्रत; तसेच उमेदवाराने दिलेल्या या लेखीसूचनाची पोहोचची प्रत पडताळून पुढील कार्यवाही करावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेनुसार,

आपला,

०८.११.२०१६

(सुरेश काकाणी)
सचिव
राज्य निवडणूक आयोगमहाराष्ट्र ,

**प्रत माहितीसाठी:** राज्य निवडणूक आयोगाकडील सर्व नोदणीकृत राजकीय पक्ष.